**पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड**
**पत्ता.- जुना पुणे-मुंबई रस्ता, रेमंड शोरूम मागे,चिंचवड पुणे ४११०१९**
**फोन नंबर.-०२० – २७४४५४५६**
**ईमेल- dcpzone1.pcpc-mh@gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक ११/०३/२०२३

# सहा वर्षाचे चिमुकल्याचे अपहरण करणा-या आरोपीस चाकण पोलीसांकडुन गजाआड, अपहरण केलेल्या बालकाची सुखरूप सुटका.

दिनांक २३/०२/२०२३ रोजी चाकण पोलीस स्टेशन येथे अश्विनी उमेश सुर्यवंशी, वय ३० वर्षे, व्यवसाय- गृहिनी, रा. आगरकवाडी रोड, चाकण ता. खेड जि. पुणे यांनी चाकण पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे पारख उमेश सुर्यवंशी, वय ६ वर्षे, रा. आगकरवाडी रोड चाकण ता. खेड जि. पुणे यास दिनांक २२/०२/२०२३ रोजी सकाळी ०९/०० ते सायंकाळी ०७/०० वा. चे दरम्यान आगरकरवाडी रोडवरून मोकळया जागेत खेळत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे कायदेशिर रखवालीतुन अपहरण करून पळवुन नेलेले आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिले वरून चाकण पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टी नं २४२/२०२३ भा द वि कलम ३६३ प्रमाणे दाखल करण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सहा. पोलीस आयुक्त, प्रेरणा कट्टे तसेच चाकण पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. वैभव शिंगारे यांनी चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकास सदर अपहृीत मुलाचा व आरोपीचा शोध घेणे बाबत सुचना व मार्गदर्शन केले. त्यांनतर चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने गुन्हयाचे घटनास्थळ परीसरातील तसेच घटस्थळावर येणारे जाणा-या रस्त्यावरील त्याच प्रमाणे चाकण परीसरातील सुमारे १०० पेक्षा जास्त ठिकाणावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यावेळी लक्षात आले की, सदर गुन्हयातील अपहृीत बालकास सु-या नावाचा फिरस्ता इसम सोबत घेवुन जात आहे. परंतु सदर गुन्हयातील आरोपी सु-या याचे पुर्ण नाव तसेच पत्ता व ठाव ठिकाणा याबाबत काहीच उपयुक्त माहिती मिळुन येत नव्हती. चाकण पोलीसांनी सदर अपहृीत मुलाचा व आरोपीचा फोटो प्रसार माध्यमांमध्ये, सोशल मिडीयावर प्रसिध्दी पत्रक तसेच पुणे, ठाणे, रायगड, अहमदनगर जिल्हयातील रेल्वे स्टेशन, बस स्थानकांमध्ये भिंतीपत्रके चिटकवुन आरोपी व अपहृीत बालकाची माहिती मिळाल्यास पोलीसांना माहिती देण्याबाबत प्रसिध्दी दिली होती. तसेच सदर आरोपी व अपहरीत मुला बाबत गोपनीय बातमीदार यांना माहिती दिलेली होती. तसेच चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने आरोपी बाबत लोणावळा येथे जावुन आरोपी व अपहृीत बालकाचा शोध घेतला. तपास पथक सदर गुन्हयातील आरोपी व अपहृीत मुलाचा कसोशीने शोध घेत असतांना दिनांक १०/०३/२०२३ रोजी वेहरगाव ता. मावळ जि. पुणे येथील पोलीस पाटील अनिल पडवळ यांनी सपोनि प्रसंन्न ज-हाड व सफौ सुरेश हिंगे यांना माहिती दिली की, नमुद गुन्हयातील अपहृीत मुलगा व एक फिरस्ता इसम कार्ला येथे दिसत आहे, सदर माहितीचे अनुषंगाने चाकण पोलीसांनी कार्ला ता. मावळ जि. पुणे येथुन अपहृीत मुलगा पारख उमेश सुर्यवंशी, वय ६ वर्षे यास आरोपी सुरेश उर्फ सु-या लक्ष्मण वाघमारे वय ४५ वर्षे, रा. पठारवाडी चाकण ता खेड जि पुणे मुळ रा. देवघर वाकसाई ता. मावळ जि. पुणे याचेकडुन ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीस गुन्हयात अटक करण्यात आलेली असुन अपहृीत मुलगा पारख यास सुखरून त्याचे पालकांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. सदर गुन्हयातील आरोपी बाबत कोणतीही उपयुक्त माहिती नसतांना चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने जुन्या पारंपारीक पध्दतीचा व बातमीदारांकडुन मिळालेल्या माहिती उपयोग करून आरोपीस ताब्यात घेवुन अपहृीत मुलाची त्याचे ताब्यातुन सुखरूप सुटका केलेली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सहा. पोलीस आयुक्त, प्रेरणा कट्टे यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.वैभव शिंगारे तसेच पोलीस निरीक्षक(गुन्हे) अनिल देवडे, तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक प्रसंन्न जराड, विक्रम गायकवाड, सुरेश हिंगे, पो हवा राजु जाधव, संदिप सोनवणे, पोना हनुमंत कांबळे, निखिल शेटे, भैरोबा यादव, पोकॉ / नितीन गुंजाळ, निखील वर्पे, अशोक दिवटे, प्रदिप राळे, सुनिल भागवत, चेतन गायकर यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रसंन्न ज-हाड हे करीत आहेत.

**(विवेक पाटील )**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड**